PUNE RESEARCH TIMES (ISSN 2456-0960)
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES SPECIAL ISSUE OCT 2018

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचारसूत्र : स्वतंत्र, समता, बंधुभाव

**प्रा. संजय त्र्यं. साळवे**
राज्यशास्त्र विभाग
सिध्दार्थ महाविद्यालय जाफ्राबाद. जालना
महाराष्ट्र भारत

"संसदीय लोकशाही ही भांडवलदारांची गुलाम असते," असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते. जगात आज बहुतांश देशामध्ये लोकशाही शासन प्रणाली अस्तित्वात आहे. जगात आज एक तत्वज्ञ, समतावादी, मानवतावादी म्हणून डॉ. आंबेडकरांचा गौरव जगामध्ये होत आहे व त्यातुनच बाबासाहेबाच्या विचार व चळवळीचा अभ्यास होत आहे. त्यातुनच डॉ. बाबासाहेबांच्या ग्रंथ व लिखानाचा संदर्भ घेऊन वेगवेगळे मत मांडण्याचा प्रयत्न होतांना दिसत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आपल्या जीवणात कार्य करीत असतांना प्रत्येक वेळी वेगवेगळी व्युव्हरचना स्विकारावी लागलेली आहे. त्या त्या वेळच्या परस्थितीनुसार निर्णय घ्यावा लागलेला आहे. त्यामुळेच बाबासाहेबांच्या सामाजिक, राजकिय, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतीक इ. विषयी लिखान करतांना सुसंगती आढळतेच असे नाही. यातून त्यांच्या विचारांचा अर्थ लावण्याचा प्रश्न निर्माण होतो; जर आपण बाबासाहेबांच्या लिखानाचा शब्दशः अर्थ लावण्याचा प्रयत्न केला तर, त्याचा अन्वयार्थ लावण्याचा प्रश्न निर्माण होतो. राजकिय, सामाजिक चळवळीच्या परस्थितीनुरुप आपल्या रणनितीत बदल करीत डॉ. बाबासाहेबांनी आपले विचार मांडले, म्हणुन केवळ त्यांचे शब्दप्रमाण माणून आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना समजून घेऊ शकत नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लिखानात/भाषाणात विविधता दिसत असली तरी त्यात एक मध्यवर्ती सुत्र दिसते आणि याच मध्यवर्ती सुत्राच्या आधारे आपण बाबासाहेबांना

समजून घेऊ शकतो. सामाजिकन्याय व त्यासाठी आवश्यक असणारी मूल्याचीच चर्चा बाबासाहेबांच्या लिखाणात व कार्यात दिसते. डॉ. आंबेडकराची चळवळ ही अस्पृश्यतेच्या प्रश्नावर केंद्रीत झाल्याचे दिसते परंतु त्यात हिंदू धर्माची चिकीत्सा करुन जातीव्यवस्था व हिंदूधर्म यांचा व्यापक प्रमाणता विचार केलेला आहे.

राज्यसमाजवाद, समाजवाद, लोकशाही व बौध्दधम्म या सर्वावरील चिंतनात तसेच त्यांच्या चळवळीतील कार्यात एक समान सुत्र व मूल्य आढळते ते म्हणजे स्वातंत्र्य, समता व बंधुता होय. आणि या सर्वांची प्रेरणा म्हणजे न्याय हेच साध्य त्यांच्या कार्याचे अधिष्ठाण असल्याचे स्पष्ट होते. 1919 ला त्यांनी "साऊथ ब्युरो कमीशन" ला सादर केलेल्या मेमेरंडम पासून ते 1957 मध्ये प्रकाशित झालेला त्यांचा शेवटचा ग्रंथ म्हणजे "बुध्दा ॲन्ड हिज धम्म" तसेच त्यांच्या अनेक प्रकाशित, अप्रकाशित लेखामधून स्वातंत्र्य, समता व बंधूता व न्याय हीच मूल्य (जीवनभरातील कार्यात) प्रतिपादीत झालेली दिसतात.

"ॲन हिलेशन ऑफ कास्ट" मध्ये बाबासाहेब स्पष्टपणे म्हणतात "मला विचाराल तर माझा आदर्श समाज म्हणजे स्वातंत्र्य, समता व बंधुता यावर आधारलेला समाज असेल." तसेच 'मुक्ती कोण पथे', 'बुध्द आणि मार्क्स', 'फिलॉसॉफी ऑफ हिंदुईझम्', इ. त्यांच्या लिखानातही त्यांनी स्वातंत्र्य, समता बंधुता व न्यायाच्या परिपेक्षातूनच चर्चा केल्याचे प्रतिपादित होते.

## स्वातंत्र्य :

स्वातंत्र्य म्हणजे जिवीत व वित्तीय हक्क एवढी तोडकी व्याख्या बाबासाहेबांना अपेक्षीत नाही."स्वातंत्र्य म्हणजे स्वत:चे सामर्थ्य वापरुन ध्येयसिध्दी करण्याची संधी असणे होय" या अर्थाने स्वातंत्र्यांचा अर्थ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित आहे. केवळ आणि केवळ व्यक्तीगत हक्क यामध्ये बाबासाहेब आग्रही दिसत नाही तर, समाज हा समुहाने बनतो यावर आग्रही दिसतात. याचेच प्रतिबींब भारतीय राज्यघटनेच्या कलम 340, 341, 342 मध्ये दिसते. आरक्षण धोरणातही त्यांचा कोणतीही एक जात किंवा व्यक्ती यांना आरक्षण न देता जातींचा समूह करुन (SC,ST,OBC,Minority) त्यांना आरक्षण फायदा त्यांच्या सामर्थ्यानुसार मिळावे अशी तरतूद केलेली आहे. म्हणजेच त्या समुहातील प्रत्येक व्तीला आपली क्षमता विकसित करण्याचे स्वातंत्र्य आहे व त्यानुसार तो त्याचा फायदा घेऊ शकतो. त्यांना हवे असलेले स्वातंत्र्य हे व्यक्तीवादी हक्कांपेक्षा भावनात्मक हक्कांना प्राध्यान्य देणारे स्वातंत्र्य होते.

संसदीय लोकशाहीच्या अपयशाच्या संदर्भाने बाबासाहेबांनी कराराच्या स्वातंत्र्यावर टीका केली आहे. कराराला दैवी स्वरुपाचे आवरण दिल्यामूळे स्वातंत्र्याचा गैरवापर होतो अशी त्यांची धारणा होती.बाबासाहेबांच्या मते संसदीय लोकशाहीमध्ये आर्थिक असमानतेकडे झालेल्या दुर्लक्षामुळे स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या लोकशाहीमध्ये समाजातील कमजोर, महिला, गरीब, दलित यांच्यावर अन्याय होऊन त्यांच्या दारिद्रयात अधिक भर घातली जाते. बाबासाहेब संसदीय लोकशाही बद्दल पुन्हा असे म्हणतात की, या पध्दतीमध्ये सामाजिक व आर्थीक लोकशाहीकडे पूर्णपणे दूर्लक्ष होते. त्यामुळे स्वातत्र्याचा समतोल राहत नाही.

## समता :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या चळवळी, लिखान यामध्ये समतेचा आग्रही धरलेला दिसतो. भारतीय समाजातील विषमतेच्या संदर्भानेच समतेची चर्चा बाबासाहेबांनी केलेली आहे. समतेचा शब्दशः अर्थ गृहीत न धरता समानसंधी व दर्जा या अर्थाने त्यांनी समता या संकल्पणेची मांडणी केलेली दिसते.कोणत्याही समाजामध्ये पूर्ण समता कधीही शक्य नसते म्हणजेच गुणवत्ता व सामर्थ्य सारखे नसतील तर, निवड ही त्यानुसारच होईल, परंतु गुणवत्ता व सामर्थ्य निर्माण होण्यासाठी समानसंधी व न्यायाची आवश्यकता बाबासाहेब प्रतिपादीत करतात.

## बंधुता :

स्वातंत्र्य व समता यांच संरक्षण हे फक्त बंधुभावामुळेच होईल असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. बंधुभाव म्हणजे, "आपल्या सभोवतालच्या माणसाबद्दल आदराची भावना म्हणजे बंधुभाव होय." 'अनहीलेशन ऑफ कास्ट' मध्य` गतीक्षमता, परस्परसंवाद, सहकार्य, सहजीवन, समकेंद्री समाजरचना ही बंधुभावाची लक्षणे बाबासाहेबांनी प्रतिपादित केलेली आहे. बंधुभाव म्हणजेच मैत्री हे लोकशाहीचे दूसरे नांव असे ते मानतात. मैत्रीतूनच समाजाची निर्मिती होते मात्र ती मैत्री ही कोणाच्याही माघार किंवा पुढाकारातून नसावी असा आग्रह ते धरतात. म्हणजे समान दर्जा व व्यक्तीप्रतिष्ठेच्या पायावर एकसंघ असा होतो व यातुनच बाबासाहेबांना अपेक्षित बंधुभाव निर्माण होतो.

बाबासाहेबांनी तहयात आपल्या चळवळ, लेखन यामध्ये स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्वांचा आग्रह धरलेला आहे. हा आग्रह त्यांनी भारतातील विषमतावादी जातीव्यवस्थेच्या संदर्भात धरलेला दिसतो. भारतीय समाजाची उभारणी करण्याकरीता त्यांनी या तत्वांचा

आग्रह धरलेला आहे. परंतु जातीव्यवस्था त्यातील प्रमुख अडसर त्यांनी अधोरेखीत केल्याचे दिसते. त्यामुळे स्वातंत्र्य, समता, बंधूता यावर आधारीत समाज निर्माण होण्यासाठी जातीव्यवस्था नष्ट झाली पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. त्यांना स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या तत्वांचा आदर्श समाजपुढे मांडूणच प्रस्थापित समाजरचनेसोबत लढा दिला.

## संदर्भग्रंथ :

1. जातीसंस्थेचे निर्मूलन – डॉ. बाबासाहेब आंबेडकर
2. कास्ट इन इंडीया – डॉ. बाबासाहेब आंबेडकर
3. स्टेटस् ॲण्ड मायनॉरीटीज – डॉ. बाबासाहेब आंबेडकर
4. डॉ. आंबेडक यांचे विचार – प्रबोधन प्रकाशन
5. आंबेडकर ॲण्ड सोशॅलीझम – सुहास पळशीकर
6. स्वातंत्र्य, समता, बंधूभाव – सुहास पळशीकर, डॉ.आंबेडकर गौरव ग्रंथ, खैरमोडे खंड –7
7. बहीष्कृत भारत
8. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आत्मकथा – डॉ. शंकरराव खरात
9. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार – शंकरराव खरात